प्रेसनोट दिनांक ११/०३/२०२५

**अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे कार्यालयातील वरिष्ठ लिपीक, श्री. हरिष दत्तात्रय मराठे तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री. हेमंत बाळकृष्ण किरपण, यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्याबाबत.**

| | | |
|---|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | :– | ठाणे |
| **तक्रारदार** | :– | पुरुष, वय– ४५ वर्षे |
| **लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | :– | १) हरीष दत्तात्रय मराठे, वय– ४७ वर्षे, पद– वरिष्ठ लिपीक (वर्ग–३), नेमणूक– प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर कार्यालय, प्रतिनियुक्ती– अपर आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, ठाणे<br>२) हेमंत बाळकृष्ण किरपण, वय– ३९ वर्षे, पद– कनिष्ठ लिपीक ( वर्ग ३), नेमणूक– प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर |
| **तक्रार प्राप्त दिनांक** | :– | दि. ०७/०३/२०२५ |
| **मागितलेली लाचेची रक्कम** | :– | दि. ०७/०३/२०२५ रोजीचे पडताळणी कारवाई मध्ये २३,०००/– रुपये ची मागणी करुन तडजोड अंती १५,०००/– लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न |
| **स्विकारली लाचेची रक्कम** | :– | दि. ११/०३/२०२५ रोजी १५,०००/– रुपये आलोसे क्र. २ यांनी स्वीकारले. |
| **थोडक्यात हकीकत** | :– | तक्रारदार यांचे आईचे वैद्यकिय बिलांची पडताळणी करुन बिलाची फाईल अंतीम मंजुरीकरीता विनाविलंब वरिष्ठांकडे सादर करण्याकरीता यातील लोकसेवक श्री. हरिष दत्तात्रय मराठे, वरिष्ठ लिपीक, तसेच श्री. हेमंत बाळकृष्ण किरपण, कनिष्ठ लिपीक हे तक्रारदार यांचेकडे २३,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत यातील तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दि. ०७/०३/२०२५ रोजी लेखी तक्रार दिलेली आहे.<br>दिनांक ०७/०३/२०२५ रोजी व दिनांक ११/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे आईचे वैद्यकिय बिलांची पडताळणी करुन बिलाची फाईल अंतीम मंजुरीकरीता विनाविलंब वरिष्ठांकडे सादर करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे २३,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडअंती १५,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्याप्रमाणे दिनांक ११/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक हेमंत बाळकृष्ण किरपण, पद – कनिष्ठ लिपीक यांना तक्रारदार यांचेकडून १५,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले असून लोकसेवक हरिष दत्तात्रय मराठे, पद – वरिष्ठ लिपीक यांना ही ताब्यात घेण्यात आले आहे. वर नमूद दोन्ही लोकसेवक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी** – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२. मा. श्री. संजय गोवीलकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्याऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in, Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्अॅप् क्रमांक – ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

( राजश्री शिंदे )
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned with CamScanner